नियमित दिवाणी दावा क्र.३९४/२०१४
नि.क्र.१३९/ क (सोबत)

प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.२

**उलटतपास वादीतर्फे वकील श्री. यु.एस. जाधव यांचेमार्फत शपथेवर सुरु.**

१. माझ्या जमिनीचा सर्वे नं.३०८ आहे. माझी जमीन वडीलोपार्जित आहे. सदर सर्वे नंबरमध्ये माझ्या नावे २ एकर १ गुंठे जमीन वारसाआधारे आलेली आहे. सदर सर्वे नंबरमध्ये आमच्या एकत्रीत कुटूंबाची ६.५ एकर जमीन आहे. माझ्या जमिनीच्या व एकत्रीत जमिनीच्या चतुःसीमा वेगवेगळ्या आहेत. दावा मिळकतीलगत माझी २ एकर १ गुंठा जमीन आहे. माझ्या नावे असलेल्या जमिनीचा चतुःसीमा दर्शविणारा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. सदरची केस जमीन कोणाच्या ताब्यात व कोणाच्या मालकीची आहे यासंदर्भात आहे. गुंडेराव व राजकुमार हे सख्खे भाऊ आहेत, याबाबत मला माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, ते दोघेही विभक्त राहतात. गट क्र.३०७ च्या पुर्वेला ३०९ आहे व पश्चीमेला निलंगा रस्ता आहे. वामनराव व शेषेराव हे मयत असून ते कधी मयत झाले याबाबत मला माहीत नाही. माझे वडील २०२० साली मयत झाले. पंढरीनाथ माझे चुलत चुलते आहेत. गट क्र.३०७ चे खरेदीखत कधी झाले आहे, याबाबत मला माहिती नाही. मी सदर खरेदीखत कधीही पाहिले नाही.

२. मी शेती करतो. मी माझ्या घराचा कुटूंब कर्ता आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.३०७ मधील १ हे २५ आर जमीन वादीच्या ताब्यात आहे. गुंडेराव यांना गट नं.१४९ व १५० मध्ये जमीन होती व ती त्यांनी विक्री केलेली आहे, याबाबत मला माहिती नाही. गट नं.३०७ मध्ये एकुण किती जमीन आहे व एकुण किती सहहिस्सेदार आहेत याबाबत मला माहिती नाही. परंतु सदर गटामध्ये प्रतिवादी सहहिस्सेदार आहे. गट नं.३०८ मधील जमीन राजकुमार व गुंडेराव यांच्या वडीलांच्या ताब्यात होती, याबाबत मला माहिती नाही. राजकुमार व गुंडेराव हे विभक्त होत असताना गुंडेरावच्या मदतीने माझ्या वडीलांना गट नं.३०८ मधील जमीन परत दिली, याबाबत मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, गुंडेरावने मध्यस्थी केली असल्यामुळे त्यांच्यावतीने साक्ष देण्यासाठी मी आज आलो आहे. गट नं.३०७ मधील १ हे.२५ आर जमीन आजही वादी भागीने देऊन जमीन कसत आहेत, याबाबत मला माहीत नाही. २०१४ मध्ये मी गावात राहून मुक्त विद्यापीठातून बी.ए. करत होतो. २०१४ साली गट नं.३०७ मधील जमिनीत काय घटना घडली होती हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा असून आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by BHOSALE VRINDA DHANANJAY
Date: 2026.03.04 17:18:06 +0530

दि.०४/०३/२०२६

(**श्रीमती. व्ही. डी. भोसले**)
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, निलंगा.